मजकुर :—

दिनांक—२०/१२/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **“ Best Detection of the Month ”** माहे ऑक्टोबर —२०२४ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे .

## (इ) १) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ऑक्टोबर—२०२४

| | | |
|---|---|---|
| १ | खंडणी विरोधी पथक, गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.वि., मुंबई | गु.र.क्र— २१७/१९९२ (भायखळा पोलीस ठाणे, गु.र.क्र. ४४६/१९९२) क. १२०(ब), १४३, १४४,१४६, १४७, १४८, १४९, ३०२, ३०७, ३२६, ३३२, ४५२, ५०६(२), २०१, २०२, २०३, २०४, २१२ भा.द.वि.सं. सह कलम ३, ५, २५, २७ भारतीय हत्यार कायदा सह ३, ५, ६ टाडा कायदा १९८७ |

“दहशत पसरवण्याच्या दृष्टीने अंदाधुंद गोळीबार करणे”

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— व्ही.पी.रोड पो. ठाणे, मुंबई गु.र.क्र. ४६४/९२ गुन्हयामध्ये अटक आरोपी नामे १) शैलेश हळदणकर २) बिपीन शेरे हे दोघे जखमी असल्यामुळे जे. जे. हॉस्पीटल येथे आंतररूग्ण म्हणुन दाखल करण्यात आले होते. नमुद आरोपीतांवर देखरेख म्हणुन व्ही.पी.रोड पोलीस ठाणेचा पोलीस बंदोबस्त पुरविण्यात आला होता. दिनांक १२/०९/१९९२ रोजी काही अज्ञात हल्लेखोरांनी दहशत पसरवण्याच्या दृष्टीने एके ४७, पिस्तुल, रिव्हॉलव्हर, हात बॉम्ब इत्यादी घातक शस्त्रानिशी सज्ज होऊन जे.जे. हॉस्पीटल येथील दुसऱ्या मजल्यावर जाऊन अंदाधुंद गोळीबार केला व तेथून निघून गेले. झालेल्या गोळीबारामध्ये वर नमुद आरोपी व दोन पोलीस अंमलदार हे मयत झाले होते. झालेल्या घटनेबाबत भायखळा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. कृष्णअवतार मुलामसिंग ठाकूर |
| बळीत/मयत इसम | | १.शैलेश शंकर हळदणकर, वय २४ वर्षे<br>२. पो.ह.क्र. ११००५/चिंतामण गणपत जसवंत<br>३. पो.शि.क्र. २२४७९/केवलसिंग बच्चु भानावत |
| आरोपी अटक व दिनांक | :— | त्रिभुवन रमापती सिंह उर्फ श्रीकांत राय रमापती राय उर्फ प्रधान, वय ६२ वर्षे,<br>**आरोपी अटक दिनांक . १९/१०/२०२४ रोजी** |

तपास कौशल्य :— सदर गुन्हयाच्या तपासात ३० च्या वर आरोपीना अटक करण्यात आली होती. सदर गुन्हयात मा.न्यायालयाने आरोपी सुभाषसिंग ठाकुर यास जन्मठेप शिक्षा व इतर काही आरोपींना शिक्षा सुनावली आहे. सदर गुन्हयातील पाहिजे आरोपीचा शोध चालू असताना नमुद गुन्हयातील गोळी लागलेला पाहिजे आरोपी हा मिर्झापूर मध्यवर्ती कारागृह, उत्तरप्रदेश येथे असल्याबाबत खात्रीशिर माहिती प्राप्त झाली होती. नमुद गुन्हयात आरोपीने स्वत:चे अस्तित्व लपविण्याकरिता खोटे नाव सगळीकडे लावले होते. सदरबाबत कौशल्य पुर्ण तपास करून पोलीसांचे म्हणणे मा. न्यायालयात सादर करून मा. विशेष टाडा न्यायालयाकडून प्रोडक्शन वॉरंट प्राप्त करून त्यास नमुद दिनांक १९/१०/२०२४ रोजी मा. न्यायालयाचे परवानगीने अटक करण्यात आली आहे.

पोलीस कोठडी दरम्यान अटक आरोपीची गुन्हा घडला त्या दिवशी गोळीबारमध्ये पोटास गोळी लागली होती. त्यामध्ये आरोपी जखमी झाला होता. त्या अनुषंगाने अटक आरोपीची

शिष्टमंडळामार्फत करण्यात आलेल्या वैद्यकिय तपासणीमध्ये सदरची जखमी ही गोळीने झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

अटक आरोपीची गुन्हयाचे अनुषंगाने हस्ताक्षर नमुने व अंगुलीमुद्रा घेण्यात आल्या असुन त्याची पडताळणी करण्यात येत आहे.

अटक आरोपीची न्यायालयीन कोठडी मंजुर झाल्यानंतर प्रत्यक्ष दर्शी व इतर साक्षीदार मार्फत मा. तहसीलदार यांच्यामार्फत कारागृहात ओळख परेड घेण्यात आली होती. त्यामध्ये नमुद साक्षीदार यांनी आरोपीस ओळखले आहे.

अशा प्रकारे मागील ३२ वर्षापासुन नमुद गुन्हयामध्ये स्वत:ची ओळख लपवुन राहिलेल्या पाहिजे आरोपीस अति महत्वाच्या गुन्हयामध्ये कौशल्यपुर्ण तपास करून त्यास अटक केली आहे.

**खंडणी विरोधी पथक, गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.वि., मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | सहाय्यक पोलीस आयुक्त डी (विशेष) | श्री. किशोककुमार शिंद | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | प्रभारी पोलीस निरीक्षक, | मिलींद मुधकर काठे | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | प्रभारी पोलीस निरीक्षक, | सुधीर आबासाहेब जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस निरीक्षक | संजय तरळगट्टी | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पोलीस निरीक्षक | समीर प्रकाश लोणकर | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पोलीस निरीक्षक | सुनिल विलास पवार | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | मारूती कदम | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | विशाल मोहीते | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | स.फौ.क्र. ३२३०४ | संदीप ब्रिद | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.ह.क्र. १२३९६ | प्रतिम पांचाळ | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.ह.क्र. ०१६४८ | राजेश श्रीपत पाटील | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.ह.क्र. ०३ १२५ | महेश मुळे | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.ह.क्र. ०३ ३९५ | निलेश कंद | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.ह.क्र. ०४००९४ | कैलास चौगुले | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.ह.क्र. ०४ ६६६ | रोहन सुर्वे | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.ह.क्र. ०४ १११९ | महेश धादवड | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.ह.क्र. ०४ १२०० | अमोल तोडकर | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.शि.क्र. ०९ ०३५० | अविनाश तात्या गावडे | प्रशस्तीपत्रक |

| | | |
|---|---|---|
| ०२ | पवई पो.ठाणे, परिमंडळ – १०, मुंबई | गु.र.क्र.६८६/२०२४, कलम ३०५,३३१(२)(४), ६१(२), ३ (५) बी.एन.एस.२०२३ |

–: "      घरफोडी करून रोख रक्कम चोरी करणे फसवणूक '':–

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :– नमुद गुन्हयात फिर्यादी श्रीमती रंजना भगवान लहाने, वय ६३ वर्षे, यांची मुलगी नामे श्रीमती रूपाली भगवान लहाने, वय ४४ वर्षे ही फ्लॅट नं. २०३, क्रिस्टल पॅलेस को.ऑ.हौ.सो., डी.पी.रोड, पवई मुंबई हया तिचा मुलगा नामे वेदांत वय ११वर्षे याचेसह दिनांक ११.०८.२०२४ रोजी दिल्ली येथे गेली होती दिनांक १३/०८/२०२४ रोजी १३:०० वा. ते २०:०० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने बेडरूमचे टाळे तोडुन पलंगात ठेवलेले रोख रक्कम रू.१०,००,०००/– चोरी करून नेलेबाबत तिच्या आईने पवई पोलीस ठाणे, मुंबई गु.र.क्र ६४१/२०२४ कलम ६८६/२०२४, कलम ३०५, ३३१(२)(४) बी.एन. एस.२०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दिनांक ०१/०९/२०२४ रोजी फिर्यादी यांची मुलगी नामे श्रीमती रूपाली भगवान लहाने, वय ४४ वर्षे यांचा जबाब नोंद केला. त्यावेळी त्यांनी नाशिक येथील व्यावहारातुन मिळालेल्या रोख रक्कमेपैकी एकुण रक्कम रूपये १ कोटी ४६ लाख चोरी झालेले आहेत असे नमुद केले. त्यावरून फिर्यादी यांचा पुरवणी जबाब नोंद केला असता त्यांनी देखील नाशिक येथील व्यावहारातुन मिळालेल्या रोख रक्कमेपैकी एकुण रक्कम रूपयेरू. १ कोटी ४६ लाख चोरी झालेले आहेत असे नमुद केले. त्यावरून नमुद गुन्हयात एकुण रक्कम रू.०१,४६,००,०००/–(एक कोटी शेहेचाळीस लाख फक्त)चोरी झाली असल्याचे निष्पन्न झाले आला.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :– | श्रीमती रंजना भगवान लहाने, ६३ वर्षे |
| चोरीस गेलेली मालमत्ता | :– | एकुण रक्कम १,४६,००,०००/– रू |
| हस्तगत मालमत्ता | :– | एकुण रक्कम १,३८,६०००/– |
| आरोपी अटक व दिनांक | :– | १) कुमार उर्फ बोक्या लक्ष्मण शिंदे वय २८ वर्षे,<br>२) आकाश काशीनाथ डांगे, वय ३० वर्षे<br>३) योगेश बाळकृष्ण पोंदे, वय २५ वर्ष,,<br>**आरोपी अटक दिनांक :– ४,८,१२/१०/२०२४ रोजी** |

**तपास कौशल्य :–** नमुद गुन्हयातील फिर्यादी श्रीमती रंजना भगवान लहाने, वय ६३ वर्षे, यांनी समक्ष पोलीस ठाणेस येवुन तक्रार दिली की, त्यांची मुलगी नामे श्रीमती रूपाली भगवान लहाने, वय ४४ वर्षे ही फ्लॅट नं. २०३, क्रिस्टल पॅलेस को.ऑ.हौ.सो., डी.पी.रोड, पवई मुंबई येथे तिचा मुलगा नामे वेदांत वय ११ वर्षे याचेसह रहावयास आहे. रूपाली ही तिचे मुलासह दिनांक ११.०८.२०२४ रोजी दिल्ली येथे गेली आहे. दिनांक १३/०८/२०२४ रोजी १३:०० वा. ते २०:०० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने बेडरूमचे टाळे तोडुन पलंगात ठेवलेले रोख रक्कम रू.१०,००,०००/– चोरी करून नेले आहेत. त्यावर त्यांचा सविस्तर जबाब नोंद करून पवई पोलीस ठाणे, मुंबई गु.र.क्र ६४१/२०२४ कलम ६८६/२०२४, कलम ३०५, ३३१(२)(४) बी.एन.एस.२०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दिनांक ०१/०९/२०२४ रोजी फिर्यादी यांची मुलगी नामे श्रीमती रूपाली भगवान लहाने, वय ४४ वर्षे यांचा जबाब नोंद केला. त्यावेळी त्यांनी नाशिक येथील व्यावहारातुन मिळालेल्या रोख रक्कमेपैकी एकुण रक्कम रूपये १ कोटी ४६ लाख चोरी झालेले आहेत असे नमुद केले. त्यावरून फिर्यादी यांचा पुरवणी जबाब नोंद केला असता त्यांनी देखील नाशिक येथील व्यावहारातुन मिळालेल्या रोख रक्कमेपैकी एकुण रक्कम रूपयेरू. १ कोटी ४६ लाख

चोरी झालेले आहेत असे नमुद केले. त्यावरून नमुद गुन्हयात एकुण रक्कम रू. ०१,४६,००,०००/— चोरी झाली असल्याचे निष्पन्न झाले.

सदर गुन्हयाच्या तपासात फिर्यादी यांची मुलगी नामे रूपाली हिचा मित्र व होणारे पती यांचेवर संशय बळावल्याने पोहक्र ९६०६०७/टिळेकर यांनी आकाश डांगे याचे राहते गाव मु. पो भाडळी खुर्द, ता. फलटण, जि. सातारा येथे जावुन केलेल्या तपासात गुन्हयाचे घटनास्थळी मिळुन आलेले सि.सि.टी.व्ही कॅमेऱ्याचे प्राप्त फुटेज वरून त्यांची ओळख पटविण्याचा प्रयत्न केला असता, फुटेज मध्ये दिसणारे पाहिजे आरोपी हा कुमार उर्फ बोक्या लक्ष्मण शिंदे वय २८ वर्षे, रा.ठि मु.पो भाडळी खुर्द, ता. फलटण, जि. सातारा अशी खात्रीशिर माहिती मिळाली. त्यावर त्याचेबाबत केलेल्या तपासात तो, आकाश डांगे याचे सोबत फलटण ग्रामीण पोलीस ठाणे, गु.र.क्र. ८८५/२०२४, कलम ३०८(६), ३०८(७), १२६(२),११५(२), १४०(२), ६१(२), ३५२, ३५१(२), ३५१(३), ३(५) बी.एन.एस या गुन्हयात अटक असुन सातारा मध्यवर्ती कारागृह, सातारा येथे न्यायालयीन कोठडीत असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यावरून मा. प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी, ६६ वे न्यायालय, मुंबई यांचे मार्फतीने मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो, फलटण, ता. फलटण, जि. सातारा यांचे कडुन ट्रान्सफर वॉरंट प्राप्त करून कुमार उर्फ बोक्या लक्ष्मण शिंदे वय २८ वर्षे यास दिनांक ०४/१०/२०२४ रोजी अटक करण्यात आली. अटक आरोपी व एकंदरीत केलेल्या तपासात पाहिजे आरोपी आकाश लक्ष्मण डांगे वय ३० वर्षे याने फिर्यादी यांची मुलगी व साक्षिदार नामे रूपाली लहाने हिचे सोबत लग्नाचा बहाणा करून तिला नाशिक येथील व्यावहारातुन रक्कम रू. २ कोटी रोखीने घेण्यास भाग पाडुन, तिचे सोबत रक्कम मोजुन ती बेड मध्ये ठेवुन, तिचे घरात पेइंग गेस्ट म्हणुन राहणारे मुलीची चावी चोरी करून, सदर चावी अटक आरोपी यांना देवुन, त्यांना चोरी करणे सहज शक्य व्हावे याकरीता रूपालीस काहीही काम नसताना दिल्ली येथे घेवुन गेला. अश्या प्रकारे कट रचुन सदर गुन्हा त्याने अटक आरोपी यांचेशी मिळुन केल्याचे तपासात निष्पन्न झाले वरून सदर गुन्हयात बी.एन.एस कलम ६१ (२) चा समावेश करण्यात आला आहे.

नमुद गुन्हयाचे घटनास्थळी प्रत्यक्ष गुन्हा करणारे आरोपी नामे कुमार उर्फ बोक्या शिंदे व योगेश बाळकृष्ण पोंदे, वय २५ वर्ष हे असुन तो आकाश लक्ष्मण डांगे वय ३० वर्षे याचेच सांगणेवरून तीघांनी मिळुन कट रचला असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून आकाश लक्ष्मण डांगे वय ३० वर्षे यांचा मा. अधिक्षक, जिल्हा कारागृह सातरा, जि.सातारा येथुन ट्रान्सफर वॉरंट घेवुन त्यास दिनांक ०८/१०/२०२४ रोजी व आरोपी नामे योगेश बाळकृष्ण पोंदे, वय २५ वर्ष यास सगुणा फलटण, जि. सातारा येथुन ताब्यात घेवुन दिनांक १२/१०/२४ रोजी अटक करण्यात आलेली आहे. अटक आरोपी कुमार उर्फ बोक्या लक्ष्मण शिंदे याने पोलीस कोठडीत असताना दिलेल्या माहिती वरून केलेल्या तपासात आरोपी आकाश डांगे याने घरफोडी केलेल्या पैशातून कुमार उर्फ बोक्या शिंदे व योगेश फोंदे उर्फ दाजीसह जावून संयोग प्रो ऑडीओ दुकानाचे मालक श्री संतोष ज्ञानेश्वर मोरे, वय ४४ वर्षे, मांजुरी खुर्द, ता.हवेली, जि. पुणे या ठिकाणी रू. ४४,७४,०००/— चे डीजे साहित्य बुक करून रोख रक्कम रू.१५,००,०००/— दिले. सदरचे साहित्य घेवून गेल्यानंतर त्यांनी साधारण पुढील १५ ते २० दिवसांत १५,००,०००/— दिले. उर्वरीत रक्कम रू.१४,७४,०००/— देणे बाकी आहे.

अटक आरोपी कुमार उर्फ बोक्या लक्ष्मण शिंदे वय २८ वर्षे याने पोलीस कोठडीत असताना दिनांक १०/१०/२०२४ रोजी दोन पंचा समक्ष निवेदन केले असुन, त्यामध्ये त्याने '' मी व योगेश फोंदे असे मिळुन आकाश याचे सांगणेवरून आकाश चे मैत्रिणीचे घरी चोरी केली होती. त्या बदल्यात आकाश याने मला रू. १० लाख दिले होते. आकाशकडे नोकरी लावण्यासाठी म्हणुन मी काही मुले दिली होती. त्यांचेकडुन मी रक्कम घेतलेली परत दयायची होती. मला मिळालेल्या रू. १० लाख रक्कमेतुन मी, रू. ५०,०००/— अविराज पाटील (सांगली), रू. ५०,०००/— प्रदिप जाधव (सांगली), रू. ५०,०००/— अक्षय पवार (सांगली), रू. ५०,०००/— काळे टपरीवाला (सांगली) व दिपक शिंदे रू. ०५,००,०००/— दिले आहेत '' असे नमुद केले आहे.

अटक आरोपी आकाश काशीनाथ डांगे, वय ३० वर्षे याने पोलीस कोठडीत असताना दिनांक १०/१०/२०२४ रोजी दोन पंचा समक्ष निवेदन केले असुन, त्यामध्ये त्याने '' मला, रूपालीचे घरी मिळालेल्या रक्कमेतुन, मी मुलांना भरती करतो म्हणुन घेतलेली रक्कम परत देण्याचा जो तगादा होता त्यामुळे मी नाशिक येथील आकाश कुरे व सोमनाथ कुरे या मध्यस्थीच्या मार्फतीने १२ मुलांचे प्रत्येकी ०४ लाख प्रमाणे ४८ लाख रूपये दिले, वाई पोलीस ठाण्यात एकुण ११ लोकांनी माझे विरूध्द फसवणुकीचा अर्ज केला होता. त्यावरून मी वाई पोलीस ठाण्यात जावुन पोलीस हवालदार यादव यांचे समक्ष प्रत्येकी १ लाख असे ११ मुलांना एकुण ११ लाख रूपये दिले, डि.जे अपडेट करण्यासाठी एकुण ३० लाख रूपये दिले, अक्षय कुमावत (जळगाव ) व दिपक शिंदे (सांगली) यांचे मध्यस्थीने आलेल्या ०५ मुलांचे प्रत्येकी ०४ लाखने २० लाख दिले. त्याच बरोबर मी फलटण मधील पुनम जोशी यांचेकडुन व्याजाने घेतलेल्या रक्कमेचे रू. १२ लाख दिले. रूपाली हिचे घरी चोरी करण्यासाठी आलेले कुमार उर्फ बोक्या यास रू. १० लाख व योगेश फोंदे उर्फ दाजी यास रू. १५ लाख दिलेले आहेत '' असे नमुद केले आहे.

अटक आरोपी योगेश बाळकृष्ण पोंदे, वय २५ वर्ष याने पोलीस कोठडीत असताना दिनांक १६/१०/२०२४ रोजी दोन पंचा समक्ष निवेदन केले असुन, त्यामध्ये त्याने '' मी व कुमार उर्फ बोक्या असे मिळुन आकाश याचे मैत्रिणीचे घरी चोरी केली होती. त्या बदल्यात आकाश याने मला रू. ९ लाख दिले होते. त्यापुर्वीच मी चोरलेल्या रक्कमेतुन रू. १४.५० लाख काढुन घेतले होते. मला मिळालेल्या एकुण रू. २३.५० लाख रक्कमेतुन मी, रू. ११,००,०००/— ची वसई येथुन एल.ई.डी स्क्रिन विकत घेतली, रू. ०१,३६,०००/— किंमतीस क्श्रप ड्रोन, रू. ५०,०००/— चा सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन, रू. ८५,०००/— एच.पी कंपनीचा लॅपटॉप, रू. २ लाख श्रीराम फायनान्स चे भरले, रू. १ लाख २५ हजार बजाज फायनान्स चे भरले, रू. ६०,०००/— हे बॅक ऑफ इंडिया चे भरले, रू. ८०,०००/— जन कल्याण पतसंस्थेचे भरले, रू. ५०,०००/— एल.आय.सी चा हफ्ता भरला, रू. १ लाख ची एफ.डी केली, रू. २ लाख डाउन पेमेंन्ट भरून टाटा मदजतं गाडी घेतली—उरलेले उर्वरीत ७ लाख लोन केले, रू. २ लाख आकाश च्या केस ची फी वकिल सागर सस्ते यांना दिली, रू. ६०,०००/— मित्र वैभव सस्ते यास दिले, रू. ५०,०००/— मित्र आकाश मोहिते यास दिले आहेत'' असे नमुद केले आहे.

अटक आरोपी नामे योगेश बाळकृष्ण पोंदे, वय २५ वर्ष, याने कोठडीत असताना दिनांक १८/१०/२०२४ रोजी केलेल्या निवेदनावरून अटक आरोपी यांनी गुन्हयाचा कट रचलेले ठिकाण हॉटेल साई रेसीडन्सी, शॉप नं २, रूस्तम मार्केट, गरीब नवाज हॉटेल जवळ, एल.टी नगर, एल. रोड, साकिनाका, मुंबई ७२. याठिकाणी केल्याचे दाखवले. सदर ठिकाणी उपस्थित असलेले मॅनेजर मिथीलेश श्रीसहदेव यादव, वय २० वर्षे, रा.ठि मोहिनी पाइपलाईन झोपडपट्टी, साकिनाका, मुंबई यांचे मदतीने तपासणी केली असता आरोपींच्या दिनांक ०७/०७/२०२४, २०/०७/२०२४, ०६/०८/२०२४ अश्या तीन नोंदी मिळुन आल्या. त्याच्या छांयाकित प्रती प्राप्त करून गुन्हयाचे कागदपत्रात समाविष्ठ करण्यात आल्या. एकंदरीत केलेल्या तपासात गुन्हयातील चोरीस गेलेली एकुण रक्कम रू. ०१,४६,००,०००/— पैकी आरोपी नामे कुमार उर्फ बोक्या लक्ष्मण शिंदे वय २८ वर्षे यास रू. १०,५०,०००/—, आरोपी नामे आकाश काशीनाथ डांगे वय ३० वर्षे यास रू. ०१,१२,००,०००/— व आरोपी नामे योगेश बाळकृष्ण पोंदे वय २५ वर्ष यास रू. २३,५०,०००/— मिळाले असल्याचे निष्पन्न झाले.

अटक आरोपी कुमार उर्फ बोक्या लक्ष्मण शिंदे याने गुन्हयात मिळालेल्या रक्कमेतुन अं. कि.रू. ०१,००,०००/— च्या दोन सोनेच्या अंगठया, वजन अंदाजे १० ग्रॅम व दोन चांदिच्या अंगठया विकत घेतल्याचे निष्पन्न झाले. त्यावर त्याचा भाऊ नामे विशाल लक्ष्मण शिंदे वय ३० वर्ष याने सदर चार ही अंगठया तपासकामी सादर केल्यावरून त्या जप्त करण्यात आलेल्या आहेत. त्याच बरोबर अटक आरोपी योगेश बाळकृष्ण पोंदे वय २५ वर्षे याचे वडील बाळकृष्ण

बबनराव पोंदे, वय ५८ वर्षे यांनी पोलीस ठाण्यात उपस्थित राहुन आरोपी नामे योगेश पोंदे याने गुन्हयातील मिळालेल्या रक्कमेतुन रू. ११ लाखाची एल.ई.डी स्क्रिन आराध्या लिव्ह इन्वेट नावाने विकत घेतली होती. सदर एल.ई.डी स्क्रिन ही सनराईज एल.ई.डी टेक चे प्रतिनिधी श्री. भावकु सुरेश लोहार, वय ३६ वर्षे यांना परत करून रू. ११ लाख ही रक्कम त्यांचे कडुन परत घेवुन सदर रक्कम तपासकामी सादर केली. त्याच बरोबर आरोपी योगेश पोंदे याने गुन्हयातील मिळालेल्या रक्कमेतुन खालील नमुद वस्तु विकत घेतल्या होत्या. सदर वस्तु त्यांनी तपासकामी सादर केल्या. गुन्हयातील मिळालेल्या रक्कमेतुन १) अं.कि.रू. ८५,०००/— भ्च कंपनीचा ट प ब ज न ै लॅपटॉप चार्जर सह २) अं.कि.रू. ५०,०००/— ैउेनदह कंपनीचा मोबाईल फोन ३) अं.कि.रू. ०१,३६,०००/— क्श्रप कंपनीचा ड्रोन या वस्तु विकत घेतल्या होत्या. सदर वस्तु त्यांनी तपासकामी सादर केल्या असता दोन पंचासमक्ष ई साक्ष मध्ये रेकॉर्डीग करून तसेच सविस्तर पंचनामा करून नमुद मालमत्ता गुन्हयाचे तपासकामी जप्त करण्यात आली.

**पवई पो.ठाणे,परिमंडळ — १०, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक, | श्री.जितेंद्र सिताराम सोनवणे, | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | श्री जयदिप कृष्णा गोसावी | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री. संतोष महादेव कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस उप निरीक्षक, | श्री. मंगेश सुर्वे | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पो.ह.क्र.९६०६०७ | तानाजी दिनकर टिळेकर | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.ह.क्र. ४९२५ | बाबू बारकू येडगे | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.ह.क्र. ०३.०८६० | आदित्य अधिकाराव झेंडे | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.शि.क्र. ०६.१८२१ | संदिप देवीदास सुरवाडे | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.शि.क्र.०९.८४१ | सुर्यकांत सुर्यकांत शेट्टी | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.ह.क्र. ०६.०६९० | विशाल पिसाळ (तांत्रिक मदत) | प्रशस्तीपत्रक |

<u>मजकुर :—</u>

दिनांक ०१/०१/२०२५ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या '' **BEST CONVICTION OF THE MONTH "** माहे ऑक्टोबर —२०२४ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ई) १) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ऑक्टोबर— २०२४

| | | |
|---|---|---|
| ०१ | वडाळा पोलीस ठाणे, बंदर परिमंडळ, मुंबई | १८८/२०२०,कलम३०२,३०७ भा.द.वि.सं |

—: '' <u>वडिलोपार्जित घरांच्या मालकी हक्कावरून वादावरून खुन</u> '':—

<u>गुन्हयाची थोडक्यात हकिकत</u> :— नमुद गुन्हयात यातील आरोपीताने यातील फिर्यादी व त्यांच्या मुलीबरोबर वडीलोपार्जित घरांच्या मालकी हक्कावरून वाद करून फिर्यादीचे अंगावर रॉकेल टाकले व फिर्यादीची मुलगी जयश्री सत्यवान शेलार, वय १९ वर्षे (मयत) या फिर्यादींना वाचविण्यासाठी गेल्या असता यातील आरोपीताने फिर्यादी यांचे मुलीच्या अंगावर रॉकेल टाकून त्यांना माचिसच्या काडीने आग लावुन जिवे ठार करण्याचा प्रयत्न केला म्हणुन गुन्हा नोंद. सदर गुन्हयात बळीत मुलगी मयत झाल्याने कलम ३०२ भा.दं.वि. अशी वाढ करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्रीमती सुनिता सत्यवान शेलार,४३ वर्षे, |
| बळीत | :— | जयश्री सत्यवान शेलार, १९ वष |
| निकाल दिनांक | :— | दिनांक २१/१०/२४ |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | जयश्री राजु कसबे उर्फ जयश्री गजरत शेलार,<br>**<u>अटक दि—१४/०७/२०२० रोजी</u>** |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | नमुद गुन्यातील आरोपी नामे जयश्री राजु कसबे उर्फ जयश्री गजरत शेलार यास दिनांक २१/१०/२४ रोजी मा. सत्र न्यायालय, कोर्ट नं. ४१, मुंबई या न्यायालयाने कलम ३०२ भा.द.वि. या कलमान्वये 'जन्मठेप व रु. २,०००/— दंड तसेच दंड न भरल्यास १ महिना साधी कैद ' ही शिक्षा ठोठावली आहे.तसेच कलम ३०७ भा.दं.वि. अन्वये ' ०७ वर्ष सक्त मजुरी व रु. १,०००/— दंड तसेच दंड न भरल्यास १ महिना साधी कैद ही शिक्षा ठोठावली आहे. (दोन्ही शिक्षा एकत्र भोगायच्या आहेत) तसेच मयत मुलीच्या आईस फिर्यादीस नुकसान भरपाई म्हणुन ६ महिन्यात २०००/रू. दयावे सदरची रक्कम वेळेत न दिल्यास १ महिना साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे |

<u>तपास कौशल्य</u> :— नमुद गुन्हयाचे तपासी अधिकारी यांनी सदर गुन्हयाचा तपास कसोशिने करुन सदर गुन्हयातील आरोपीस अटक करून आरोपीविरुध्द सबळ भौतिक व तांत्रिक पुरावा गोळा करुन त्याचेविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सदर खटल्याच्या वेळोवेळी

वडाळा पोलीस ठाणे, बंदर परिमंडळ, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव

| अ. क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | श्री. महेंद्र काळडोके | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस उप निरीक्षक | श्री.दत्ता कोकणे | प्रशस्तीपत्रक |
| ३ | स.पो.उप नि. २४००१ | श्री. दिनकर सानप | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पो.शि.क्र.०९०२०६७ | देविदास पालवे | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.शि.क्र.०९०५४८ | समीर धुमाळ | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पो.शि.क्र.१४०७६६ | अमोल खेडकर. | प्रशस्तीपत्रक |